

# लिंग समभाव आणि महिला सक्षमीकरण




मुख्य संपादक

प्राचार्य डॉ. अशोक खैरनार

संपादक

प्रा. कांतीलाल सोनवणे

प्रा. अतिष मेश्राम

डॉ. प्रियंका सुलाखे


अथर्व

Scanned with OKEN Scanner

# लिंग समभाव
# आणि
# महिला सक्षमीकरण

**Gender Equality and Women Empowerment**

मुख्य संपादक
प्राचार्य डॉ. अशोक खैरनार

सहसंपादक
प्रा. कांतीलाल सोनवणे
प्रा. अतिश मेश्राम
डॉ. प्रियंका सुलाखे

अथर्व पब्लिकेशन्स

Scanned with OKEN Scanner

अथर्व पब्लिकेशन्स

# लिंग समभाव आणि महिला सक्षमीकरण

Gender Equality and Women Empowerment

© सुरक्षित

ISBN : 978-93-87129-94-8
Book No. : 603

**प्रकाशक**

युवराज भटू माळी

**अथर्व पब्लिकेशन्स**

**धुळे :** १७, देवीदास कॉलनी, वरखेडी रोड, धुळे ४२४००१.
संपर्क : ९४०५२०६२३०

**जळगाव :** तळमजला, ओम हॉस्पिटल, अँग्लो उर्दू हायस्कूलजवळ, ढाके कॉलनी, जळगाव ४२५००१. संपर्क : ०२५७-२२३९६६६, ९७६४६९४७९७

ई-मेल : atharvapublications@gmail.com
वेबसाईट : www.atharvapublications.com

**प्रथमावृत्ती :** २० ऑक्टोबर २०१८
**अक्षरजुळवणी :** अथर्व पब्लिकेशन्स
**मूल्य :** ६९५/-

**ऑनलाईन पुस्तक खरेदीसाठी www.atharvapublications.com**

*निजामपूर-जैताणे शिक्षण प्रसारक मंडळाचे आदर्श कला महाविद्यालय, निजामपूर-जैताणे येथे दि. २० ऑक्टोबर २०१८ रोजी झालेल्या एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्रातील निवडक लेख.*
*या पुस्तकात समाविष्ट लेखांचे हक्क ज्या-त्या लेखकांकडे असून त्यांच्या मताशी मुख्य संपादक, संपादक मंडळ, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. सर्व हक्क राखून ठेवले आहेत.*



Scanned with OKEN Scanner

- साहित्यातील समाजसुधारकांचा स्त्री विषयक विचार.......... ८१
  - प्रा.डॉ. संजय राजधर महाले
- स्वयंसहाय्यता बचतगट आणि महिला सक्षमीकरण........... ८५
  - डॉ. संभाजी पाटील
- महिला सबलीकरण आणि स्त्री जीवन .................... ९०
  - प्रा. नाईक पी.एन.
- राष्ट्रीय विकास आणि महिला सक्षमीकरण .................. ९२
  - प्रा. सुरेश रमण देसले
- भारतातील आर्थिक नियोजन आणि स्त्री सक्षमीकरण ........ ९७
  - प्रा. श्रीमती नेरे अरुणा विजयकुमार
- जात, लिंगभाव आणि हिंसाचार ........................... १०२
  - प्रा. गजेंद्र सोमा जगदेव
- श्रीमती इंदिरा गांधी ....................................... १०७
  : भारताच्या प्रभावशाली महिला पंतप्रधान
  - प्रा. शरद बाबुराव सोनवणे
- महिला सबलीकरण आणि सामाजिक स्थित्यंतरण .......... ११३
  - प्रा. दत्तात्रय प्रभूराव मुंढे
- गीता साने यांच्या 'हिरवळीखाली' ......................... ११६
  या कादंबरीमधील स्त्री चित्रण
  - प्रा. मिलिंदकुमार भिकाजी देवरे
- निवडक दलित कथेतील स्त्री दर्शन.......................... १२१
  - प्रा. अरुण डी. मोरे
- 'कुलवधु'चे कथानक व सामाजिक स्थिती ................. १२५
  - प्रा. निलेश एकनाथ पाटील
- महिलांचे घटनात्मक व कायदेशीर अधिकार ................ १३३
  - प्रा.डॉ. राजू परभत निकम
- महिला सक्षमीकरण आणि महिलांचा राजकीय सहभाग ..... १४०
  - प्रा. रमेश एकनाथ भारुडकर
  - प्रा. गजानन भिकाजी फुलसावंगे




Scanned with OKEN Scanner

# श्रीमती इंदिरा गांधी : भारताच्या प्रभावशाली महिला पंतप्रधान

– प्रा. शरद बाबुराव सोनवणे
राज्यशास्त्र विभाग, श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला व
कै.डॉ. भास्कर सदाशिव देसले विज्ञान महाविद्यालय, साक्री, जि. धुळे

## प्रस्तावना

भारताच्या राजकीय इतिहासात ज्या ज्या महान व्यक्तींनी आपल्या कार्यकर्तृत्वाचा ठसा उमटवला आहे. त्यामध्ये श्रीमती इंदिरा गांधी यांचे नाव अग्रस्थानी आहे. आजही भारतीय राजकारण इंदिरा गांधी यांचे नाव घेतल्याशिवाय पुढे सरकतच नाही. मुळात इंदिरा गांधी यांना राजकारणाचे बाळकडू स्वातंत्र्यपूर्व काळात त्याच्या कुटुंबातच मिळाले होते. स्वातंत्र्यानंतर एक प्रभावशाली महिला पंतप्रधान म्हणून भारतीय राजकारणात त्यांनी आपल्या नेतृत्वाची अमिट अशी छाप सोडली. तत्पूर्वी फेब्रुवारी १९५५ मध्ये त्या काँग्रेस कार्य समितीत दाखल झाल्या, त्याच वर्षी सप्टेंबर मध्ये त्यांना काँग्रेसच्या केंद्रीय निवडणूक समितीचे सदस्य म्हणून नियुक्त करण्यात आले. त्यानंतर १९५८ मध्ये त्या काँग्रेसच्या संसदीय बोर्डाच्या सदस्य म्हणून निवडल्या गेल्या तर १९५९ मध्ये त्यांची काँग्रेस अध्यक्षपदी निवड झाली. पुढे १९६६ साली देशाच्या पंतप्रधान झाल्यावर भारताच्या व जागतिक राजकारणात इंदिरा गांधींनी स्वत:चा प्रभाव निर्माण केला. म्हणून भारताच्या या प्रभावाशाली महिला पंतप्रधानाच्या कार्यकर्तृत्वाचा वस्तुनिष्ठ अभ्यास करण्याचा प्रयत्न प्रस्तूत शोधनिबंधात केला आहे.

## श्रीमती इंदिरा गांधी भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान

स्वातंत्र्यप्राप्ती नंतर पंडित जवाहरलाल नेहरु हे भारताचे पहिले पंतप्रधान म्हणून विराजमान झाले ते त्यांच्या मृत्यूपर्यंत म्हणजे १९६४ पर्यंत पदारुढ होते. नेहरुंच्या निधनानंतर लाल बहादूर शास्त्री हे भारताचे दुसरे पंतप्रधान म्हणून निवडले गेले. इंदिरा गांधींनी आपल्या मंत्रिमंडळात परराष्ट्र व्यवहार मंत्रालय सांभाळावे अशी शास्त्रींची इच्छा होती. परंतू इंदिरा गांधींनी 'माहिती व नभोवानी मंत्री' म्हणून शपथ घेतली. १९६५ मध्ये भारत-पाकिस्तान युद्ध सुरु झाले आणि युद्धसमाप्तीनंतर सो. रशियाच्या मध्यस्थिने भारत – पाक यांच्यात ताश्कंद येथे शांतता करार झाला व याच दिवशी काही तासातच शास्त्रीजींचे हृदयविकाराने निधन झाले. '१० जानेवारी १९६६ रोजी ताश्कंद येथे लाल बहादूर शास्त्री यांच्या आकस्मित निधनाने देशापुढे पुन्हा एकदा अनिश्चितता व संकट निर्माण झाले. गुलजारीलाल नंदा यांना पुन्हा दोन आठवड्यासाठी कार्यवाहक पंतप्रधान



Scanned with OKEN Scanner

बनविण्यात आले. पंतप्रधानपदाच्या निवडीमध्ये कांग्रेस अध्यक्ष कामराज यांनी यावेळी प्रमुख भूमिका बजावून पंतप्रधान पदासाठी इंदिरा गांधी यांची बाजू घेतली. मोरारजी देसाई यांनी निवडणूक लढवली. इंदिरा गांधी यांना ३५५ तर मोरारजी देसाई यांना १८९ मते पडली. २४ जानेवारी १९६६ रोजी इंदिरा गांधी यांनी पंतप्रधानपदाची शपथ घेतली.'१ पुढे सतत तीनवेळेस म्हणजे १९६६ ते १९७७ पर्यंत त्याच पंतप्रधान राहिल्या. पुन्हा चौथ्यांदा १९८० ते १९८४ या कालावधीत म्हणजे त्यांची हत्या होईपर्यंत इंदिरा गांधी पंतप्रधानपदी आरुढ होत्या.

**इंदिरा गांधींच्या पंतप्रधानपदाच्या पहिल्या टप्प्यातील कामगिरी**

१९६६ मध्ये पहिल्यांदाच पंतप्रधानपदी विराजमान झाल्यावर इंदिरा गांधी यांनी पंडित नेहरुंप्रमाणेच समाजवादी धोरणे राबवण्यास सुरुवात केली. त्यांनी आपल्या धोरणांना आडकाठी ठरणारे उपपंतप्रधान मोरारजी देसाई यांच्याकडून जुलै १९६९ मध्ये अर्थमंत्रालय काढून स्वत:कडे घेतले आणि "लेखणीच्या एका झटक्यानिशी देशातल्या १४ प्रमुख बँकांचे इंदिरा गांधींनी राष्ट्रीयीकरण केले. टाटांच्या अधिपत्याखाली चालणारी सेंट्रल बँक यापैकी सर्वात मोठी त्यात सुमारे चारशे कोटी रुपयाच्या ठेवी होत्या. तुलनेने सर्वात लहान बँक म्हणजे बँके ऑफ महाराष्ट्र प्रा.व्ही.जी.काळे आणि डी.के.साठेंनी १९३५ साली पुण्यात सुरु केलेल्या या बँकेत जवळपास ७० कोटींच्या ठेवी होत्या. याखेरीज बिर्ला समुहाकडे त्या काळी युनायटेड कमर्शिअल बँकेची सुत्रे होती. या सर्वांनाच राष्ट्रीयीकरणाच्या धडक निर्णयाचा थेट फटका बसला. देशातल्या २० अग्रगण्य बँकाच्या तत्कालिन आर्थिक सर्वेक्षणानुसार जे १८८ संचालक या बँका चालवायचे ते देशातल्या अन्य १४५२ कंपन्यांचेही संचालक होते. प्रचंड प्रमाणात खाजगी नफा आणि अधिकार मिळवण्यासाठी या बँकाचा बराच निधी या सर्वांनी बिनदिक्कतपणे वापरला. या बँकाची दारे आता विशिष्ट वर्गाऐवजी जनसामान्यांसाठी खुली झाली. ग्रामिण विकासाला उत्तेजन देणे, शेतीचे आधुनिकीकरण घडवणे, ट्रॅक्टर्स खरेदी करण्यासाठी शेतकऱ्यांना, टॅक्सी खरेदी करण्यासाठी टॅक्सी चालकांना कर्जपुरवठा उपलब्ध करुण देणे हा या बँकाचा नवा प्राधान्यक्रम ठरला."२ याचप्रमाणे इंदिरा गांधींनी तनखेबंदीचा देखिल निर्णय घेतला. त्यामुळे सर्वसामान्य जनतेमध्ये इंदिरा गांधींची लोकप्रियता खुप वाढली.

इंदिरा गांधींचा देशात व आंतरराष्ट्रीय पातळीवर देखिल याकाळात प्रभाव वाढत होता. "१९७१ मध्ये पाकिस्तानशी झालेल्या युद्धात यश मिळाले तेव्हा इंदिरा गांधी या दुर्गामातेचा अवतार आहेत; असे अटलबिहारी वाजपेयी म्हणाले होते."३ यानंतर "१८ मे १९७४ रोजी राजस्थानातील पोखरण इथे भारतीय



Scanned with OKEN Scanner

अणुशास्त्रज्ञांनी पहिली अणुचाचणी यशस्वी करुन भारताची अण्वस्त्रक्षमता सिद्ध केली. या काळात देशात राजकीय व सामाजिक आंदोलनामुळे तापलेल्यां वातावरणाला पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या अणुचाचणीच्या धाडसी निर्णयामुळे एकदम कलाटणी मिळाली. १९७१ च्या बांग्लादेश मुक्तियुद्धातील विजयामुळे इंदिरा गांधी यांची कणखर व खंबीर अशी जी प्रतिमा तयार झाली होती. ती या निर्णयामुळे अधिक उंचावली.''४ इंदिरा गांधींनी एकापाठोपाठ एक असे जे धाडसी व धडाडीचे निर्णय घेतले त्यामुळे त्यांची राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर एक खंबीर नेतृत्व म्हणून प्रतिमा तयार झाली. या सोबतच इंदिरा गांधींच्या विरोधकांची संख्यादेखील वाढत होती.

**इंदिरा गांधी यांच्या अडचणीचा काळ : पराभव व पुर्नरागमन**

२५ जुन १९७५ रोजी इंदिरा गांधींनी ३५२ व्या कलमानुसार देशात घोषित केलेल्या आणिबाणीचा निर्णय वादग्रस्त ठरला. १८ जानेवारी १९७७ रोजी आणिबाणी उठवून निवडणूकांना सामोरे जाण्याचा त्यांनी निर्णय घेतला. १९७७ सालच्या निवडणूकीत इंदिरा गांधींचा दारुन पराभव झाला. लोकसभेच्या ८४ जागा असणाऱ्या उत्तरप्रदेशात कॉंग्रेसला एकाही ठिकाणी विजय मिळवता आला नाही. रायबरेली आणि अमेठी मध्ये इंदिरा गांधी व संजय गांधी दोघेही पराभूत झाले. या सोबतच तत्कालीन कॉंग्रेस अध्यक्ष के. ब्रम्हानंद रेड्डी यांनी १ जानेवारी १९७८ रोजी इंदिरा गांधींची पक्षातून हकालपट्टी केली. या कारवाईस त्यावेळचे जेष्ट नेते यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, देवकांत बारुआ, सरदार स्वर्णसिंग इत्यादींचा पाठिंबा होता. लगेचच २ जानेवारी १९७८ रोजी इंदिरा गांधींनी 'इंडियन नॅशनल कॉंग्रेस (आय)' या नव्या पक्षाची स्थापना केली. तसेच कॉंग्रेस (आय) पक्षाचे मुख्यालय २४ अकबर रोडवरच्या आंध्रप्रदेशचे जी वेंकटस्वामी यांच्या वास्तुत थाटण्यात आले. १९७७ साली कॉंग्रेसचा पराभव करुन मोरारजी देसाई यांच्या नेतृत्वाखाली केंद्रात सत्तेवर आलेले जनता पक्षाचे सरकार अनेक विसंगती व अंतर्कलहामुळे अपेक्षेपेक्षा लवकर कोसळले. जानेवारी १९८० मध्ये झालेल्या सातव्या लोकसभेच्या आणि निवडणूकीत कॉंग्रेस (आय) पक्ष ३५३ जागांवर विजय मिळवत पुन्हा सत्तेवर आला आणि श्रीमती इंदिरा गांधी पुन्हा चौथ्यांदा भारताच्या पंतप्रधान पदी विराजमान झाल्या.

**ऑपरेशन ब्लू स्टार – इंदिरा गांधींचा धाडसी निर्णय**

१९८० साली इंदिरा गांधी पुन्हा पंतप्रधानपदी आरुढ झाल्यावर एप्रिल १९८० मध्ये झालेली पंजाब विधानसभेची निवडणूक देखिल कॉंग्रेसने जिंकली. त्यांनतर अल्पावधीतच जर्नेलसिंग भिंद्रनवाले यांच्या नेतृत्वाखाली पंजाबमधील स्वतंत्र खलिस्तानच्या चळवळीने उग्र रुप धारण केलेलं होत. पंजाबमधील

वाढत्या हिंसाचारामुळे साऱ्या देशात चिंतेच वातावरण निर्माण झाल होत. अमृतसरमधील शिखांच पवित्र स्थान असलेल्या सुवर्णमंदिरात भिंद्रनवाले आणि अन्य खलिस्तानवादी दहशतवाद्यांनी आश्रय घेतल्याने त्यांना हुसकावून लावून दहशतवादाचा बीमोड करण्यासाठी इंदिरा गांधीच्या केंद्र सरकारने लष्करी कारवाईचा धाडसी निर्णय घेतला व ५ जुन १९८४ रोजी 'ऑपरेशन ब्लू स्टार' ही मोहिम राबविली. या कारवाईत भिंद्रनवाले यांच्यासह ४९२ दहशतवादी मारले गेले.'५ या कारवाईच्यावेळी पंतप्रधान असलेल्या श्रीमती इंदिरा गांधी यांची त्यांचे शरीररक्षक सतवंत सिंग आणि बेअंत सिंग यांनी ३१ ऑक्टोंबर १९८४ रोजी हत्या केली. या कारवाईचा आदेश देऊन सुवर्ण मंदिरात सैन्य घुसवल्याबद्दल सुड घेण्यासाठी त्यांची हत्या करण्यात आली.६ अशा प्रकारे एका धगधगत्या असिम धैर्य व साहस बाळगणाऱ्या, निर्णय चतुर प्रभावशाली महिला पंतप्रधानाचा शेवट झाला. परंतू त्यानंतर त्याचे दुसरे चिरंजीव राजीव गांधी यांच्या नेतृत्वात डिसेंबर १९८४ साली झालेल्या आठव्या लोकसभेच्या निवडणूकीत लोकांनी इंदिरा गांधी यांच्याबद्दल असलेल्या सहानुभूतीपोटी राजीव गांधींच्या कॉंग्रेसला, मतदान झालेल्या ५१४ पैकी ४०४ जागांवर विजयी करुन विक्रमी बहुमत दिले. १९८५ साली उर्वरित २७ जागांसाठी मतदान झाले त्यातही १० जागांवर कॉंग्रेस पक्ष विजयी झाला.

**पंतप्रधान इंदिरा गांधी – स्त्रीवादी दृष्टीकोन**

इंदिरा गांधी ह्या भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान झाल्यावर बऱ्याच वर्षांनंतर कोणीतरी इंदिराजींना विचारले, पंतप्रधानपदी महिला असणे ही उपयुक्त गोष्ट आहे की अडथळा? त्यावर त्या म्हणाल्या, 'मी एक स्त्री आहे, म्हणून कोणताही फरक पडला असे मला अजिबात वाटत नाही. विनाकारण स्त्री-पुरुषांना दोन स्वतंत्र क्षमतेच्या चौकटीत बंदिस्त करणारा असा हा प्रश्न. सारी क्षमता अन गुणवत्ता केवळ पुरुषांकडेच असते, अन स्त्रीकडे नसते, काही कामे पुरुषच करु शकतात, असे मत तुम्ही कोणत्या गृहितकाच्या आधारे बनवले? अशी कोणती विशेष क्षमता अथवा गुणवत्ता असते, जी स्त्रीकडे नाही? केवळ शारीरीक शक्ती? कमतरता आणि मर्यादा तुम्ही शोधत असाल तर स्त्री आणि पुरुष अशा दोघांमध्येही त्या तुम्हाला आढळतील. देशाचे पंतप्रधानपद स्वीकारणाऱ्या व्यक्तीने आपण स्त्री आहोत की पुरुष, आपण कोणत्या जाती धर्माचे याचा विचार सुद्धा मनात आणण्याची आवश्यकता नाही असे मला वाटते. लोकांनी तुम्हाला स्वीकारले, देशाचे नेतृत्व विश्वासाने तुमच्या हाती सोपवले, हेच सर्वात महत्वाचे.'७

ब्रिटीश ब्रॉडकास्टिंग कॉर्पोरेशन (बीसीसी) ने १९९९ साली केलेल्या जागतिक



Scanned with OKEN Scanner

सर्वेक्षणाच्या मतदानात एक हजार वर्षांतील कर्तृत्ववान सर्वश्रेष्ठ महिला म्हणून लोकांनी इंदिरा गांधींची निवड केली. इंदिरा गांधींचा गौरव [illegible] करताना बीबीसीने म्हटले, 'महिलांच्या हक्कांचा खरा अर्थ पुरुषप्रधान काळात इंदिरा गांधी स्त्रियांच्या समान हक्कांविषयी सतत जागरूक होत्या. भारत प्रचंड कर्तृत्व अडचणीतून मार्गक्रमण करीत असतांना, अतुलनीय धैर्य, त्या अडचणींना सामोरे गेल्या आणि आयुष्यातला मान कष्ट करून म्हणून त्यांनी आपली क्षमता सिद्ध केली. कोणाचे सारे सद्गुण इंदिरा गांधींमध्ये होते. तर पुरुषप्रधान संस्कृतीत महिलांचा आत्मसन्मान वाढविण्यासाठी त्यांनी अविरत लढा दिला.' ८ स्त्रियांकडे केवळ सृजनशीलच नाही तर नियोजन, नियमन, व्यवस्थापन, प्रशासन व समाजकारण आणि राजकारणाचेही सामर्थ्य स्त्रियांकडे असते हे ठामपणे इंदिरा गांधी यांनी आपल्या कार्यकर्तृत्वातून दाखवून दिले. हे सर्वमान्य स्तुतीप्रद आहे.

### समारोप

इंदिरा गांधींचे राजकीय कर्तृत्व प्रचंड धाडसी होते. म्हणून स्त्रिया कोणत्याच क्षेत्रात कमी नाही हे त्यांनी सिद्ध केले. घडोघडी अनेक आव्हानांचा धैर्याने मुकाबला करत त्यांची यशस्वी वाटचाल सुरु होती. तो म्हणून त्या कोठेही डगमगल्या नाहीं. वाडलट तडजोड न करता अचूक मार्गाने निर्णय घेत इंदिरा गांधींनी आपल्या सामर्थ्यांचे प्रकटीकरण केले. राष्ट्रीय राजकारण असो की, आंतरराष्ट्रीय राजकारण असो, देशहिताचे निर्णय घेण्याची अचाट दूरदृष्टी इंदिरा गांधींकडे होती. बँकांचे राष्ट्रीयकरण, राजेमहाराजांचे तनखेबंद असे समाजहिताचे खंबीर निर्णय त्यांनी कोणत्याही राजकीय नफा तोट्याचा विचार न करता घेतले. बांग्लादेश मुक्तीचा प्रश्न, अणुचाचणी, असे राष्ट्रहिताचे निर्णय त्यांनी आंतरराष्ट्रीय दबावाला बळी न पडता घेतले. ऑपरेशन ब्लू स्टार मोहिम राबवतांना त्यांनी देशाची एकता व अखंडतेसाठी कणखर भूमिका घेतली. त्याचा सूड घेण्यासाठी त्यांची हत्या झाली. असे धाडसी निर्णय घेतल्यामुळे त्यांना व त्यांच्या कुटुंबाला धोका निर्माण होऊ शकतो, याची कल्पना इंदिराजींना होती. परंतू त्यांचे नेतृत्व डगमगणारे नव्हते. निर्भयतेने व धैर्याने राष्ट्रहित डोळ्यासमोर ठेवून निर्णय घेण्याचा त्यांचा पिंड होता. म्हणूनच त्यांच्या मरणोत्तर आजही भारतीय राजकारणावर त्यांचा प्रभाव दिसून येतो. राजकारणात येऊ इच्छिणाऱ्या प्रत्येक स्त्री-पुरुषास माजी पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधींचे नेतृत्व हे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रभाव निर्माण करणारे ठरले. भारताच्या व जगाच्या इतिहासात त्याला तोड नाही.

अशा प्रकारे स्त्रिया राजकीय क्षेत्रात व जीवनाच्या इतर कोणत्याही क्षेत्रात



Scanned with OKEN Scanner

पुरुषांपेक्षा कमी नसून काही बाबतीत सरस आहेत हे इंदिरा गांधींनी आपल्या कार्यकर्तृत्वातून सिद्ध केले.

संदर्भसूची


१. विश्व प्रकाश गुप्त व मोहिनी गुप्ता, 'भारतीय राजनीति - विकास और विश्लेषण', राधा पब्लिकेशन्स, नई दिल्ली, २००९, पृ. ३३१.
२. रशिद किदवई (अनुवाद - सुरेश भटेवरा), '२४ अकबर रोड', चिनार पब्लिशर्स, मुंबई, २०१३, पृ. ६३.
३. पी.एन. धर (अनुवाद - अशोक जैन), 'इंदिरा गांधी आणिवाणी व भारतीय लोकशाही', रोहन प्रकाशन, पुणे, २००६, पृ १४८.
४. सुहास कुलकर्णी व मिलिंद चंपानेरकर (संपा.), 'असा घडला भारत १९४७-२०१२', रोहन प्रकाशन, पुणे, २०१३, पृ. ४१८.
५. कित्ता, पृ. ५१०.
६. ले.जन. के.एस. ब्रार (अनुवाद - भगवान दातार), 'ऑपरेशन ब्लू स्टार - जस घडल तस...', रोहन प्रकाशन, पुणे, २०१६, पृ. १४८.
७. उपरोक्त, पृ. ६३.
८. कित्ता, पृ. ५०.


Scanned with OKEN Scanner